# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**(शासन निर्णय दि.27.09.2018 नुसार) TENDER NOTICE No. ( ) 2025-2026**

## निविदा सुचना क्र. नांवाशमनपा/साबांवि/ई-निविदा/ 1768 /2025 दि. 7/05/2025

आयुक्त महानगरपालिका नांदेड हे खाली दर्शविण्यात आलेल्या कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन B-१ नमुन्यात निविदा मागवित आहेत. या निविदा फक्त वेबसाईट https://mahatenders.gov.in वरुन खरेदी करता येईल. निविदेच्या अटी व शर्ती वरील वेबसाईटवर नमुद असतील निविदा फक्त इंटरनेटवरुन खरेदी करता येतील व इंटरनेटवरुन भरता येतील. सर्व कंत्राटदारांना Digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

ई-निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रकाशीत करणे | 8/5/2025 | १५:०० |
| २ | ई-निविदा डाऊनलोड करणे | 9/5/2025 | १५:०० |
| ३ | ई-निविदा भरणे | 9/5/2025 | १५:०० |
| ४ | ई-निविदा भरण्याचा अंतिम | 19/5/2025 | १५:०० |
| ५ | ई-निविदा उघडणे | 21/5/2025 | १५:०० |

| अ. क्र. | विभागाचा क्रमांक | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (रुपये) | इसा-याची रक्कम रु. 0.5% | सुरक्षा अनामत रक्कम रु. 1% | को-या निविदा किंमत विक्री करासहीत 28% (GST) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०१.०१. २०२५ | मु.सो.सु. योजने अंतर्गत नांवाशमनपा हद्दीतील प्रभाग क्र. १९ कौठा व कमालनगर व संत गाडगेबाबा सोसायटी व श्रीपादनगर व इतर रस्ते (WBM) सहीत व सी सी रस्ता व आरसीसी नाली करणे. | ४२५७८८७७/ | २१५०००/ | ४३००००/ | ३८४०/ | ०६ महिने |

नियम अटी व शर्ती

A ) निविदाधारकांनी निविदेसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित छायाप्रती तांत्रिक लिफाफयात ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे.

१) कंत्राटदाराने इसारा रक्कम EMD आणि निविदा शुल्क (Tender Fee) भरणा केलेली कागदपत्रे सकॅन /छायांकित प्रत दाखल करणे बंधनकारक आहे .

२) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम २०१८ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

३) सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.

४) वस्तु व सेवा कर विभाग, (GST) महाराष्ट्र शासन यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.

५) निविदा धारकाने EPF व `ESIC नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६) निविदा धारकाने सन (२०२१-२२,२०२२-२३,२०२३-२४) या तीन वर्षाचा आयकर (Income Tax) भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यासोबत Audit Report सादर करणे आवश्यक आहे.

७) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. सीएटी-२०२२/प्र.क्र./इमा-२ दि. ११.०५.२०२२ अन्वये निविदाधारकांनी निविदेसाठी कामाचे नाव टाकुन निविदेसोबत जोडण्यात आलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे मुद्रांकवरचे प्रतिज्ञापत्र १००/- रुपयाच्या मुळ स्टॅम्प पेपरवर प्रत्येक निविदेसाठी स्वतंत्र टाकुन जोडणे बंधनकारक आहे

८) महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० फ नुसार महापालिका पदाधिका-याने निविदा संदर्भात प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रमाणपत्र निविदाधारकांना लेटर हेडवर सादर करणे बंधनकारक राहील.

९) सिमेंट कॉक्रीट कामासाठी लागणारी मशिनरी स्वत:च्या मालकीचे असल्यास मशिनरीच्या कागदपत्राचा पुरावा दाखल्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे. सिमेंट कॉक्रीट कामासाठी लागणारी मशिनरी स्वत:च्या मालकीचा नसल्यास त्याबाबतचा वैध भाडे तत्वावर करारनामा सादर करणे आवश्यक आहे.

१०) डांबराच्या कामासाठी हॉटमिक्स प्लांट स्वतःच्या मालकीचा असणे गरजेचे आहे किंवा भाडेतत्वावर घेतल्यास या बाबतचा करारनामा असणे आवश्यक आहे.

११) विद्युत कामासाठी कंत्राटदाराने विद्युत कंत्राटदाराशी करारनामा करुन, करारनामा व विद्युत कंत्राटदाराचे सार्वजनिक बांधकाम विभागार्कडील चालु नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१२) सन २०१९-२०, २०२०-२१,२०२१-२२,२०२२-२३,२०२३-२४ मागील पाच वर्षातील कंत्राटदाराची कमाल वार्षिक ऊलाढाल प्रत्येक कामाच्या ७०% असणे आवश्यक आहे

१३) मागील पाच वर्षात कंत्राटदाराने तुल्यबळ किंमतीचे किमान १ व त्याच स्वरुपाचे काम पुर्ण केले असले पाहिजे त्याची कमीतकमी किंमत कामाच्या ८०% असणे आवश्यक आहे.

१४) देय कामासाठी मागील पाच वर्षापैकी कोणत्याही ०१ वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाचे आहे. त्याचे कमीत कमी परिमाण महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/इमारती-२ दि.२५ आक्टोबर २०१९ असणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकातील जास्त परिमाण असणा-या पाच बाबींचे परिमाण स्वतंत्र प्रपत्रात नमुद करण्यात यावे.

१५) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.सीएटी-२०२२/प्र.क्र.५०/इमारती-२ दि.११.०५.२०२२ व दि.१२.०५.२०२२ अन्वये रु. ५०.०० लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदा मध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट करण्याबाबत नमुद केले आहे. तथापी एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षात तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वित्तीय वर्षात पुढील निविदांसाठी बीड कॅपीसीटीची शर्त लागु राहील. करीता चालु वित्तीय वर्षात हाती घेतलेल सर्व कामांची निविदा विषयक माहिती सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

**बिड कॅपॅसिटी= (अे X एन X २-बी )**

अे- गेल्या ५ (पाच) वर्षातील जास्तीत जास्त वार्षीक उलाढाल चालु दराने

एन- देय कामाचा कालावधी (वर्ष)

बी- हातातील कामाची किंमत (देय कामाच्या कालावधीतील)

Bid Capacity काढण्यासाठी या निविदे सुचने सोबत दिलेल्या प्रपत्रात माहिती देणे आवश्यक असुन सदर माहिती उप अभियंता या पेक्षा कमी दर्जाच्या अधिका-याने प्रमाणीत केलेली नसावी.

B) निविदाधारकांनी निविदेसाबत वाणिज्य क लिफाफा केवळ ब-१ नमुन्यात ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे.

C) इतर अटी व शर्ती

१) निविदा धारकाने ई-निविदा पोर्टलवर "बीड लॉक" झाल्यानंतर निविदांबाबत "हार्ड कॉपी" १ प्रतीत दि. .०५.२०२५ रोजी दुपारी १५.०० पर्यत कार्यकारी अभियंता, सावांवि, कक्ष क्र.१०६, नांवाशमनपा यांच्या कार्यालयात सादर करावे.

२) तांत्रिक लिफाफा मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यास निविदाधारक /कंत्राटदार पुर्णपणे जबाबदार राहतील.

३) देय कामाच्या विशिष्ट स्वरुपानुसार समकक्ष काम कंत्राटदारांनी प्रत्यक्ष केलेले असणे अनिवार्य आहे.त्याचबरोबर निविदाधारकाने संबंधित कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

४) अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास सा.बां.विभागाचा शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/ इमा- २ दिनांक २७.०९.२०१८ मधील शुध्दीपत्रक दि.२६ नोव्हेंबर, २०१८ नुसार लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-या L-१ निविदाकाराने "Additional Performance Security Deposit" आठ दिवसाच्या आत संबंधीत शहर अभियंता यांचे कडे जमा करावे. सदर परफॉर्मन्स सिक्युरीटी हि बँकेची प्रतीपुर्ती हमी / डिमांड ड्राफ्ट स्वरुपात मा. आयुक्त, नांवाशमनपा, नांदेड यांच्या नांवे सादर करावी.

उदा:- देकार १९ % पेक्षी कमी दराचा असल्यास,

१० % कमी दरापर्यत १ % व

१५ % कमी दरापर्यत -(१५ % -१०% = ५%)

तसेच (१९-१५) = ४ % करीता (४x२=) ८ %

असे एकुण (१+५+८) = १४ %)

५) कंत्राटदाराने ईसारा रक्कम EMD ची रक्कम E-Tender या संकेतस्थळाच्या Online Payment Gateway द्वारे भरणा करावी.

६) सिमेंट कॉक्रीटचे कामासाठी लागणारी मशिनरी १) Dozer २) Front end Loader (JCB) ३) Concrete Mixer with integral Weigh Batching Facility, ४) Concrete Batching and Mixing Plant (Minimum capacity-१५ m३/hour) ५) Vibrator (Plate & Needle) ६) Tripper ७) Paver Concrete Machine 8) Soil Compactor 9) T.M. 10) Pocklain स्वत:च्या मालकीचे असणे किंवा भाडेतत्वावर घेतल्यास या बाबतचा करारनामा असणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त ७ वर्ष जुनी असणे आवश्यक आहे. डांबराच्या कामासाठी लागणारी मशिनरी जसे हॉटमिक्स प्लॉट, व्हायबरेटरी रोलर, सेन्सर पेव्हर इ. मशिनरी स्वत:च्या मालकीचे असणे किंवा भाडेतत्वावर घेतल्यास या बाबतचा करारनामा असणे आवश्यक आहे.

७) निविदाधारक यांनी त्यांचेकाडील कंत्राटी कामगार /मजुर यांचा EPF व ESIC चा भरणा वेळेच्या आत करणे आवश्यक आहे. तसेच त्यांना मिळालेल्या कामामधुन EPF व ESIC कामगारांचे नांवासहीत यादीसह चालान भरणा करणे आवश्यक आहे. याबाबतची संपुर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील.

८) उणिवांच्या दुरुस्तीचा कालावधी (Defect libility Period) हा महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- २०१८/ प्र.क्र.१५१/ इमारती-२ दि. १४.०१.२०१९ अन्वये राहील.

९) निविदाधारकास या महानगरपालिकेने कोणत्याही कारणास्तव निविदा भरण्यास प्रतिबंध केलेला नसावा अथवा काळया यादीत टाकलेले नसावे असल्यास अशा निविदाधारकांची निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

१०) कामाची तांत्रिक तपासणी (Third Party Technical Audit) शासनाच्या आदेशाप्रमाणे शासकीय संस्थेकडून केल्यानंतरच व प्रमाणीत करुन दिल्यावरच कामाचे देयक अदा करण्यात येईल. कंत्राटदाराने सदरचे काम Steel Design ने बांधत असल्याची खात्री ME Structural Engineer मार्फत किंवा तज्ञ व्यक्तीकडुन शहनिशा करुन रिपोर्ट सादर करणे बंधनकारक राहील.

११) नांवाशमनपा क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजना (२२१७०९१३) सन २०२४-२०२५ अंतर्गत मंजुर विकास कामांची छाननी करण्यासाठी मा. जिल्हास्तरीय समितीच्या दि.११.०४.२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय लागु राहतील.

१२) कंत्राटदाराने कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर शासकिय विमा कंपनी कडुन विमा पॉलीसी काढणे अनिवार्य आहे.

१३) कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार आयुक्तांनी राखून ठेवलेले आहेत.

१४) शासनाची प्रचलित B-१ निविदा पध्दती लागु राहील.

१५) निविदे अंतर्गत कामांसाठी भाववाढ कलम लागु राहणार नाही.

१६) निविदा पुस्तिकेतील सर्व अटी व शती लागु राहतील.

१७) कामांतर्गत महत्वाच्या बाबीची गुणवत्ता तपासणी वारंवारीतेनुसार घेणे बंधनकारक राहील.

१८) सदर कामाबाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास न्यायीक प्रकरण मा.जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड पुरते मर्यादीत राहील.

स्वा/-
**अति-आयुक्त,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

प्रतिलिपी:

१) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

२) ई-टेंडरींग विभाग/संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

अति-आयुक्त,
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

पत्ता :- वजीराबाद, नांदेड. दुरध्वनी :- (०२४६२) २३४४०४

ई-मेल पत्ता :- info@nwmcnanded.org फॅक्स क्र.:- (०२४६२) २३२०७१


**ई-निविदा सुचना क्र.नांवाशमनपा/साबांवि/ 1767 /२०२५ दि. 7/5/2025 व 1768 /२०२५ दि 7/05/2025**

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व आर्थीक व तांत्रिक क्षमता असलेल्या कंत्राटदाराकडुन वर नमुद निविदा सुचना **निहाय कामाकरीता (मुलभूत सोयी सुविधा योजना** व ना. स्था. स्व. सं. प.वि. नागरी सेवा व सुविधा अंतर्गत्त (सी.सी.रस्ते व सीसी नाली,सभागृह,टीनशेड,पेव्हरब्लॉक)) B-१ नमुन्यातील **ई-निविदा प्रणाली नुसारच ऑनलाईन निविदा मागवित आहेत.** (निविदा कागदपत्र https://mahatender.gov.in **या संकेत स्थळावरुन** डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास उक्त वेबसाईटवर व कार्यालयीन सुचना फलक याद्वारे कळविण्यात येईल.

स्वा/-

अति-आयुक्त,

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

प्रति,

संपादक,

दैनिक लोकमत (राज्यस्तर) ८x१२ चौसेमी

दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तर) ८x१२ चौसेमी

दैनिक एकमत 8x12 चौसेमी (जिल्हास्तर)

दि. 08/05/2025

यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील निविदा सुचना आपल्या दिनांक 8/5/2025 च्या वर्तमानपत्रात वर दिलेल्या आकारमानात प्रसिध्द करुन देयकाच्या २ प्रति शासन मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.

अति-आयुक्त,

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**